# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती
## कार्यपत्रिका क्रमांक : ४
## सभावृत्तांत

दिनांक : १८/८/२०१० वेळ : दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १८/८/२०१० रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. साबळे जगन्नाथ दगडू -सभापती
२ मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार - उपसभापती
३ मा. आदियाल (शीख) शोभा गुरूमितसिंग
४ मा. सुतार विजया विजय
५ मा. सुपे भाऊसाहेब रामभाऊ
६ मा. कुमार आर.एस.
७ मा. प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबू नायर

याशिवाय मा. कारचे - सहा. आयुक्त, मा. सुर्यवंशी - कायदा सल्लागार, मा. पाटील - कार्यकारी अभियंता, मा. सहस्त्रभोजनी - प्र. उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-

विषय क्रमांक - १) भोसरी वॉर्ड क्र. २६ मधील महात्मा फुले नगर झोपडपट्टीमध्ये कॉंक्रीट पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत..

विषय क्रमांक - २) से.नं. २२ मधील शाळा इमारतींची दुरूस्ती देखभाल करणेबाबत ..

विषय क्रमांक - ३) रस्ता डी.पी. प्रमाणे करणेबाबत..मा. अख्तरहुसेन चौधरी मा. बाबु नायर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - ४) मोरवाडी येथे लाल टोपीनगर मधील झोपडपट्टीधारकांचे पुर्नवसन करणेबाबत..मा. अख्तरहुसेन चौधरी मा. बाबु नायर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - ५) झोपडपट्टीचे पुर्नवसन करणेबाबत.. मा. बाबु नायर मा. अख्तरहुसेन चौधरी यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - ६) मिलिंदनगर पिंपरी येथील वाल्मिकी आश्रम येथे दुमजली इमारत बांधणेबाबत ..मा. बाबु नायर मा. भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - ७) बोपखेल येथिल रामनगर झोपडपट्टी घोषित करणेबाबत..मा. भाऊसाहेब सुपे मा. बाबु नायर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - ८) अंगणवाडीतील कुपोषित बालकांना अतिरिक्त पौष्टीक आहार पुरविणेबाबत मा. विजया सुतार मा. शोभा आदियाल यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - ९) शासन निर्णय क्रमांक गवसु-१०९८-/५/प्र.क्र.११/नवि-२९ दिनांक ५ जून १९९८ च्या अनुषंगाने अधिकार देणेबाबत मा. बाबु नायर मा. कुमार आर.एस. यांचा प्रस्ताव..

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा. बाबू नायर अनुमोदक : मा. भाऊसाहेब सुपे

सुप्रसिध्द बांधकाम व्यावसायिक बी.जी. शिर्के, जेष्ठ कवी नारायण सुर्वे व पत्रकार के.एम.मॅथु यांचे दुख:द निधन झाल्याने श्रध्दांजली वाहून बुधवार दिनांक १८/८/२०१० रोजी दुपारी २.१० पर्यत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

---------------

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली)

मा.सभापती : बुधवार दिनांक १८/८/२०१० रोजी दुपारी २.१० पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे.

(साबळे जगन्नाथ दगडू )
सभापती
झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि
समाज कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ४
सभावृत्तांत
( दि. १८/८/२०१० (दुपारी २.००) ची तहकूब सभा)

दिनांक : १८/८/२०१० वेळ : दुपारी २.१० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समितीची दि. १८/८/२०१० (दुपारी २.००) ची तहकूब सभा बुधवार दिनांक १८/८/२०१० रोजी दुपारी २.१० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. साबळे जगन्नाथ दगडू -सभापती
२. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार - उपसभापती
३. मा. आदियाल (शीख) शोभा गुरूमितसिंग
४. मा. सुतार विजया विजय
५. मा. सुपे भाऊसाहेब रामभाऊ
६. मा. कुमार आर.एस.
७. मा. प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबू नायर

याशिवाय मा. कारचे - सहा. आयुक्त, मा. सुर्यवंशी - कायदा सल्लागार, मा. पाटील - कार्यकारी अभियंता, मा. सहस्त्रभोजनी - प्र. उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.बाबू नायर अनुमोदक : मा. भाऊसाहेब सुपे

शुक्रवार दिनांक २७/८/२०१० रोजी दुपारी २.०० पर्यत सभा तहकूब करणेत यावी.
सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

-----------

मा.सभापती : शुक्रवार दिनांक २७/८/२०१० रोजी दुपारी २.०० पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे.

(साबळे जगन्नाथ दगडू )
सभापती
झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि
समाज कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ४
सभावृत्तांत
( दि. १८/८/२०१० (दुपारी २.०० व २.१०) ची तहकूब सभा)
दिनांक : २७/८/२०१० वेळ : दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समितीची दि. १८/८/२०१० (दुपारी २.१० ) ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक २७/८/२०१० रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. साबळे जगन्नाथ दगडू -सभापती
२. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार - उपसभापती
३. मा. आदियाल (शीख) शोभा गुरूमितसिंग
४. मा. सुतार विजया विजय
५. मा. कुमार आर.एस.
६. मा. प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबू नायर
७. मा. सावळे सिमा

याशिवाय मा. कारचे - सहा. आयुक्त ,मा.चाकणकर - उपनगरसचिव, मा. पाटील - कार्य.अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

दिनांक ०४/०८/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ३ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

-----------

ठराव क्रमांक :- १३ विषय क्रमांक :- १
दिनांक :- २७/०८/२०१०
सूचक :- मा.अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक :- मा. बाबु नायर
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३८८/२०१० दि.१६/८/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भोसरी वॉर्ड क्र. २६ मधील महात्मा फुले नगर झोपडपट्टीमध्ये कॉंक्रीट पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी र.रू. १७,९८,५००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- १४ विषय क्रमांक :- २
दिनांक :- २७/०८/२०१०
सूचक :- मा. विजया सुतार अनुमोदक :-मा. शोभा आदियाल
संदभ :- मा.सक्षम प्राधिकारी यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३९२/२०१०
दि.१८/८/२०१०

मा.सक्षम प्राधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -
से.नं. २२ मधील शाळा इमारतींची दुरूस्ती देखभाल करणेकामी र.रू. ६,३८,१००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- १५ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- २७/०८/२०१०
सूचक :- मा.अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक :- मा. बाबु नायर
संदर्भ :- मा. अख्तरहुसेन चौधरी मा.बाबु नायर यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. आयुक्त यांच्या निवासस्थानापासून, लिटाका कंपनी मोरवाडी ते पिंपरी चौक हा रस्ता डी.पी. प्रमाणे करणेत यावा तसेच काही भाग झोपडपट्टी बाधीत असल्यामुळे योग्य ते पुर्नवसन करून कार्यवाही पुर्ण करणेत यावी. .

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक :- १६ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- २७/०८/२०१०
सूचक :- मा.अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक :- मा. बाबु नायर
संदर्भ :- मा. अख्तरहुसेन चौधरी मा.बाबु नायर यांचा प्रस्ताव..

मोरवाडी येथे लाल टोपीनगर मध्ये २००० झोपडीधारक राहत आहेत. सदर झोपडपट्टीधारकांचे पुर्नवसन करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर प्रकल्प लवकरात लवकर पुर्ण करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक :- १७ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- २७/०८/२०१०
सूचक :- मा. बाबु नायर अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा. बाबु नायर मा.अख्तरहुसेन चौधरी यांचा प्रस्ताव..

वॉर्ड क्र. ६८ मध्ये रमाबाईनगर, निराधारनगर, बौध्दनगर, झोपडपट्टी आहे सदर झोपडपट्टी सन १९९५ पुर्वी पासून असल्याने सदर झोपडपट्टीचे पुर्नवसन करणे आवश्यक असल्याने त्याचे पुर्नवसन करणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक :- १८ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- २७/०८/२०१०
सूचक :- मा. बाबु नायर अनुमोदक :- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ :- मा. बाबु नायर मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव..

मिलिंदनगर पिंपरी येथे जुना वाल्मिकी आश्रम आहे. सदर ठिकाणी दरवर्षी वाल्मिकी जयंती साजरी केली जाते. सदरचा वाल्मिकी आश्रम जुना झाला असल्याने सदर ठिकाणी दुमजली सांस्कृतिक इमारत बांधणे आवश्यक आहे तरी सदर ठिकाणी दुमजली सांस्कृतीक इमारत बांधणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- १९ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- २७/०८/२०१०
सूचक :- मा. भाऊसाहेब सुपे अनुमोदक :- मा. बाबु नायर
संदर्भ :- मा. भाऊसाहेब सुपे मा. बाबु नायर यांचा प्रस्ताव..

बोपखेल येथे रामनगर झोपडपट्टी सन १९९५ पासून आहे. सदर ठिकाणी ७५० झोपड्या आहेत. परंतु मनपाच्या झोपडपट्टीच्या यादीत सदर झोपडपट्टीचा उल्लेख नाही. तरी सदर रामनगर झोपडपट्टी घोषित करून त्याठिकाणी सुविधा पुरविणेत याव्यात.सदर ठिकाणी सर्व मागासवर्गीय नागरिक रहात असल्याने त्याठिकाणी समाज मंदिर तातडीने बांधणेकामी र.रू. १६,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- २० विषय क्रमांक :- ८
दिनांक :- २७/०८/२०१०
सूचक :- मा. विजया सुतार अनुमोदक :- मा. शोभा आदियाल
संदर्भ :- मा. विजया सुतार मा. शोभा आदियाल यांचा प्रस्ताव

अंगणवाडीतील कुपोषित बालकांना प्रस्तावात नमुद प्रमाणे अतिरिक्त पौष्टीक आहार पुरविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- २१ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- २७/०८/२०१०
सूचक :- मा. बाबु नायर अनुमोदक :- मा. कुमार आर.एस.
संदर्भ :- मा. बाबु नायर मा. कुमार आर.एस. यांचा प्रस्ताव
शासन निर्णय क्रमांक गवसु-१०९८-/५/प्र.क्र.११/नवि-२९ दिनांक ५ जून १९९८ च्या अनुषंगाने मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाजकल्याण समितीला सर्व अधिकार देणेबाबत प्रशासनाने जरूर तो प्रस्ताव मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाजकल्याण समितीमार्फत मा. महापालिका सभेपुढे ठेवावा. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली

सूचक :- मा. बाबू नायर अनुमोदक :- मा. आर.एस.कुमार
मा. महापौर योगेश बहल यांचे वडील मंगलसेन बहल यांचे दुखःद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली

------

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली. )

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(साबळे जगन्नाथ दगडू)
सभापती
झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि
समाज कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/०९/कावि/१११९ /२०१०
दिनांक :- ३/ ९ /२०१०

उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.